विशेष केंद्रीय सहाय्य, भारतीय घटनेच्या अनुच्छेद क्र.२७५(१) व आदिम जमातीचा विकास या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त निधीमधून राज्यातील अनुसूचित व आदिम जमातीच्या कुटूंबांना घरकूल योजनेचा लाभ देण्याबाबत.

कार्यालय
प्रकल्प अधिकारी
डेहणी ११२९
आ. क्र.
दिनांक. १९/८/०८

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक केंद्रीय -२००५/प्र.क्र.९६/का-१७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दि. ३० जुले, २००८.

वाचा :
१) शासन पत्र, आदिवासी विकास विभाग क्र.केंद्रीय -२००५/ प्र.क्र.९६/ का.१७, दि.११-८-२००५
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.१४०२०/११/२००५-एसजी ॲण्ड सी. दि. २९ डिसें.२००५
३) केंद्र शासनांचे पत्र क्र.१४०२०/११/२००५-एसजी ॲण्ड सी, दिनांक ९.१२.२००५.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.खर्चनि-१००६/प्रक्र.१/अर्थोपाय, दि.२०-४-२००६.
५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.केंद्रीय-२००५/प्र.क्र.९६/का-१७, दिनांक २३-६-२००७
६) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.बीयुडी-२००७/प्र.क्र.८/का-७, दिनांक ११-४-२००७
७) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.पीटीजी-२००६/प्र.क्र.१३५/का-१७, दिनांक २६-२-२००७
८) आयुक्त,आदिवासी विकास विभाग, यांचे क्र.केंद्रीय-२००६/प्र.क्र.६१/ का-११(३) दि.२६-७-०७चे पत्र.
९) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. पीटीजी-२००६/प्र.क्र.१३५/का-१७, दिनांक २१.०२.२००८ व शुध्दिपत्रक दिनांक २६.०२.२००८.
१०) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक जीओआय-२००८/ प्र.क्र.१०/ का-११, दिनांक २२.०२.२००८.
११) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्रमांक जीओआय-२००८/प्र.क्र.१६/ का.१७, दिनांक २९.०३.२००८

**प्रस्तावना :-** आदिवासी विकास विभागाने विशेष केंद्रीय सहाय्य, भारतीय घटनेच्या अनुच्छेद क्र.२७५(१) व आदिम जमातीचा विकास या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त निधीमधून राज्यातील अनुसूचित व आदिम जमातीच्या कुटूंबांना घरकूल बांधण्यासाठीचे प्रस्ताव सन २००५-०६ व २००६-०७ या वर्षामध्ये केंद्र शासनास पाठविले होते. सदर प्रस्तावांमध्ये आदिवासींसाठी पक्की घरे ज्यामध्ये एक बैठकीची खोली, स्वयंपाक घर, शौचालय व स्नानगृह

यासाठी एकूण मिळून रुपये ६०,०००/- खर्चाचा समावेश होता. केंद्र शासनाने या प्रस्तावास मान्यता दिली असून निधी देखील राज्य शासनास उपलब्ध करुन दिलेला आहे. ही योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ही योजना राबविण्याबाबत शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

शासन निर्णय:- विशेष केंद्रीय सहाय्य, भारतीय घटनेच्या अनुच्छेद क्र.२७५(१) व आदिम जमातीचा विकास या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीमधून राज्यातील अनुसूचित व आदिम जमातीच्या कुटूंबांना घरकूल योजनेचा लाभ देण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) सदर योजनेकरिता बांधावयाच्या घरांमध्ये एक बैठकीची खोली, स्वयंपाक घर, शौचालय व स्नानगृह यांचा समावेश असेल. सदर घरकुलाच्या बांधकामासाठी रु.५७,५००/- व विद्युतीकरणासाठी रु.२,५००/- असा एकूण रु.६०,०००/- (प्रति घरकुल) खर्च करण्यात यावा. यापेक्षा जास्त खर्च आल्यास तो संबंधित स्वयंसेवी संस्थेकडून करण्यात यावा. सदर घरकुलाच्या बांधकामाचा प्रमाणभुत नकाशा (Type Plan) सोबत जोडण्यात आलेला आहे.

२) नियंत्रक अधिकारी :- आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास.

३) योजना राबविणारी यंत्रणा :- संबंधित प्रकल्प अधिकारी खालील पध्दतीचा अवलंब करतील.

१) आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यरत नामांकित समाजसेवी संस्था ज्या खालील अटींची पूर्तता करतील त्यांच्याकडून घरकुलांची कामे करुन घेण्यात यावीत.

अ) सदर संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असाव्यात किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन कायदयाअंतर्गत नोंदणीकृत असाव्यात.

ब) सदर संस्थांचे लेखापरीक्षण गेल्या किमान पांच वर्षामध्ये नागरी लेखापरीक्षकाकडून केलेले असावे व त्याचा दर्जा किमान "अ" वा त्याहून अधिक असावा.

क) अशा प्रकारची घरकुलांची कामे करण्याचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव असावा. आतापर्यंत किती घरकुले बांधली याची माहिती संस्थेकडून घेण्यात यावी व त्याची खातरजमा करावी.

ड) ज्या सामाजिक संस्था (एन.जी.ओ) स्वत:चा आर्थिक सहभाग घालून दर्जेदार काम करण्यास इच्छुक असतील त्यांना प्राधान्य देण्यात यावे. परंतु सदर संस्था घरकुल बांधकामामध्ये तज्ञ असावी.

इ) सदर संस्थाना घरकुलाची कामे केंद्र शासनाकडून मिळणा-या निधीतून देण्यात यावीत. ( संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) व विशेष केंद्रीय सहाय्य योजनेखाली )

ई ) संस्थेने एकुण रक्कमेच्या ५ टक्के अनामत रक्कम देणे आवश्यक आहे.

प) संस्थेची वार्षिक उलाढाल किमान रु.७५ लक्ष एवढी असावी.

फ) संस्थेकडे काम करणारे प्रशिक्षित गवंडी,सुतार इ.स्वत:चे असावेत.

म) कामाची गुणवत्ता वेळोवेळी बांधकाम खात्यामार्फत तपासली जाईल.

२) प्रकल्प अधिकारी,पेण यांच्या कार्यक्षेत्रात चिल्ड्रेन्स फ्युचर इंडिया, ता.पेण, जि.रायगड ही स्वयंसेवी संस्था सदर योजनेची अंमलबजावणी करील. सदर संस्था इतरही प्रकल्प क्षेत्रात काम करण्यास इच्छुक असल्यास सदर संस्थेला काम देण्यात यावे.

३) सेंटर ऑफ सायन्स फॉर व्हिलेजेस, वर्धा या संस्थेस सुध्दा सदरचे काम ती ज्या जिल्ह्यामध्ये करण्यास इच्छुक आहे त्या जिल्ह्यामध्ये देण्यात यावे.

४) घरकुल बांधकामाशी संबंधित यवतमाळ येथील संस्थेस तसेच श्री. प्रकाश आमटे यांच्या स्वयंसेवी संस्थेसही घरकुलाचे बांधकाम देण्यात यावे.

५) ज्या प्रकल्प क्षेत्रात स्वयंसेवी संस्था घरकुलांचे बांधकाम करण्यास पुढे येत नसतील अथवा वरील अटींची पूर्तता करीत नसतील तर सदरचा निधी घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे सुपूर्द करुन त्यांचे मार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. सामाजिक संस्था अथवा डिआरडिए घरकुले बांधण्यास नकार दिल्यास घरकुल बांधकामाचे काम निविदा मागवून देण्यात यावे.

४) अनुदान वाटपाचे सूत्र :-

घरकुलासाठी अनुज्ञेय असलेल्या अनुदानाचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| | |
|---|---|
| अ) घरकुलाचे बांधकामास मंजुरी मिळाल्यानंतर | एकूण रक्कमेच्या २० टक्के |
| ब) जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर | एकूण रक्कमेच्या २० टक्के |
| क) लिंटल लेव्हलपर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर | एकूण रक्कमेच्या ३० टक्के |
| ड) छतापर्यंत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर | शिल्लक रक्कम ३० टक्के |

५) योजनेच्या अटी व शर्ती :-

(१) लाभार्थी हा आदिवासी / आदिम जमातीचा असावा.

(२) लाभार्थ्याकडे स्वतःची किंवा शासनाने दिलेली जमीन असावी.

(३) लाभार्थ्याकडे स्वतःचे किंवा कुटुंबियांचे पक्के घर नसावे.

(४) इतर विभागाच्या घरकुल योजनांतर्गत सदर लाभार्थ्यांने लाभ घेतलेला नसावा.

(५) घरकुलाचे बांधकाम सोबत जोडण्यात आलेल्या प्रमाणभुत नकाशानुसार (Type Plan) असावे.

(६) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे सदर योजनेचा वेळोवेळी आढावा घेतील व योजनेवर झालेल्या खर्चाविषयी, प्रगतीविषयी त्रैमासिक अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व संबधित अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना सादर करतील व त्याची एक प्रत शासनास पाठवतील.

लाभार्थी निवडीची प्रक्रिया यापुर्वी मान्य केल्याप्रमाणेच चालू राहील.

२. विशेष केंद्रीय सहाय्य, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अन्वये व आदिम जमातीचा विकास या तीन योजनांतर्गत राज्यातील अनुसूचित व आदिम जमातीकरिता घरकुल योजना राबविण्यासाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे तसेच देण्यात येईल. सबब, अनुसूचित व आदिम जमातीसाठी सोबतच्या टाईप प्लॅनप्रमाणे पक्की घरे बांधण्याच्या घरकुल योजनेस या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्यामुळे सदर योजनेची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. घरकुल योजनेसाठी उपलब्ध होणारा निधी खालील लेखाशिर्षाखाली यापुढे अर्थसंकल्पित करण्यात येईल / करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

अ. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत घरकुल योजनेसाठी केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेला निधी " मागणी क्रमांक टी-५, लेखाशीर्ष-२२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण (०६) (०१) भारत सरकारच्या संविधान २७५(१)-केंद्रीय सहाय्य-४३-अर्थसहाय्य (२२२५ २४२४)" -या लेखाशिर्षाखाली खर्च करण्यात यावा.

ब. विशेष केंद्रीय सहाय्यांतर्गत घरकुल योजनेसाठी केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेला निधी "मागणी क्रमांक-टी-५-लेखाशिर्ष-२२२५- अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-०२-अनुसूचित जमातीचे कल्याण-१०२-आर्थिक विकास-१३-विशेष सहाय्य योजनेतर्गत एकात्मिक योजना (१३) (०१)-विशेष केंद्रीय सहाय्य योजना (२२२५ ३५५६)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

क. आदिम जमातीसाठी घरकुल योजनेतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी मागणी क्र. टी-५,२२२५,अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-८००- इतर खर्च -(५) आदिम जमातीच्या विकासासाठी केंद्रीय क्षेत्र योजना (०१) (०५) केंद्र पुरस्कृत योजना (२२२५ ३००१) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेताक २००८०७३०१७०१३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( एन. एच. सावंत )
उप सचिव

प्रति,
आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक (५ प्रति)
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
अपर आयुक्त, आदिवासी विकास (प्रत्येकी २ प्रति) ठाणे,/ नाशिक/ अमरावती/ नागपूर
मा.मंत्री (आदिवासी विकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव, आदिवासी विकास यांचे स्वीय सहाय्यक
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन अधिकारी
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ /२ महाराष्ट्र, मुंबई /नागपूर
महालेखापाल (लेखापरिक्षा ) १ /२ महाराष्ट्र, मुंबई /नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग